# कविता लहानांसाठी

-- चं.प्र.देशपांडे.

## मुंबैसफर

गाडीमधून दाढीवाले  माकड निघाले मुंबैला
सूटबूट, टाय, चष्मा — प्रवास त्याचा पहिलावहिला

लोक म्हणाले माकडासारखा दिसणारा हा साहेब आहे
हाकलले तर नाहीच कुणी उलट विचारले नाही -- आहे

प्रवासभर इंग्लिश पेपर घेऊन माकड वाचत राहिले
मधेच पळती झाडे पाहात खोल विचार करत राहिले

मुंबै येताच आली त्याच्या लक्षात आता कठीण बाब
तिकीट नाही कुठलेच याचा तिकीटचेकर विचारील जाब

फलाटावरून एका उडीत गाडीवर मग शेडवर
कपडे, चष्मा, पेपर टाकून उड्या मारत रोडवर

असे करत भर मुंबैत माकड चालले टणाटणा
मुले म्हणाली, ' हुप--हुप ', गर्दीमधून खाणाखुणा

असे करत, दमूनभागून काहीतरी ते खाल्ले--प्याले
गाढ झोपून कॉलेजमधून हुशार होऊन बाहेर आले

मुंबैमध्ये बघण्यासारखे, शिकण्यासारखे खूप आहे
असे म्हणून तरी म्हणाले परतावे हेच बरे आहे.
.-o-o-

## चष्मागीत

कोण कुठला सावंत
त्याचा फुटकाच चष्मा
सारे दिसते फुटके
तरी याचा वरचष्मा

चष्मा काढून म्हणाला
जग अंधारात आहे
डोळे मिटून म्हणतो
आतबाहेरले पाहे

चष्मा घालुनिया म्हणे
उजेडाचे भाग मोजा
डाव्या पायातला बूट
उजव्या पायाचा मोजा.
-o-o-

## एसटी

कुठे चालली ही एसटी
कोल्हापूर ते गारगोटी

या या या लौकर बसा
एसटी सुटल्यानंतर हसा
रस्त्यावरून पळे एकटी

डोंगर झाडे सुळ सुळ सुळ
ओढा वाहे झुळ झुळ झुळ
धूळ उडविते काचेपाठी

कुणी झोपते कुणी वाचते
कुणी हासते वा बडबडते
वळणावरून वळे हळुच ती
-o-o-

## फूल

फूल हसले की नाकाला गोड येतो वास
नाक म्हणे वा, वा अजून थोडे हास
फुलाने म्हटले गाणे की डोळ्यांना दिसतात रंग
डोळे म्हणतात किती छान झालो आम्ही दंग
नाक आणि डोळे पाहून बहरतात फुले
संध्याकाळी आनंदाने आभाळही डुले
-o-o-

## ॲटमबॉंबची गोष्ट

मांजरानं धरला
मुंगीचा कान
कुत्रा म्हणाला,
" हा माझाच मान

मी आहे आपल्या तिघांत मोठ्ठा
तुम्ही दोघे तर आहात लहान
तुम्ही तर छोटे लिंबूटिंबू
धरणार मीच तुमचे कान."

मांजर म्हणालं " खूप पाहिलेत
तुला मी मुळीच भीत नाही. "
मुंगी म्हणाली, " आभाळ मोठ्ठं,
त्याच्याहून मोठ्ठं कुणीच नाही. "

कुत्रा खूप चिडला
पळत पळत गेला
विमानात बसला
आभाळात घुसला

विमान आलं खूप जोरात
कुत्र्यानं टाकला ॲटमबॉंब
मांजर उडालं पडक्या घरावर
मुंगी उडाली चार मैल लांब

नंतर विमान खाली उतरलं
त्यातून उतरला कुत्रा
पडक्या घरावरून उतरलं मांजर
म्हणालं त्याला, " कसं काय मित्रा ! "

त्यांची झाली पुन्हा एकदा मैत्री
नंतर कुत्र्याला आलं रडू
म्हणाला " आपली मुंगी कुठं गेली ?
खरंच मी वेडा, असं नये चिडू."

त्यांनी मग मुंगीला शोध शोध शोधलं
बसले मग वाट बघत
चार महिन्यांनी मुंगी आली
मजल दरमजल करत.
-०-०-

## दिवा

दिवा बघा दिवा
रोज दिसतो नवा

दिवा आहे शूर
अंधार पळतो दूर
-०-०-

## मी आपली सडेतोड

मी आपली सडेतोड
प्रत्येकाची मोडते खोड

भाऊ आमचा अती हट्टी
म्हणून मी घेते त्याच्याशी कट्टी

चिऊताई मला सापडत नाही
तांदूळ तिला मी देतच नाही

माझ्या हाताहून उंच येतं फुल
दाखवतच नाही त्याला मी माझे नवे डूल

बाबांशीच बोलतात सगळे मोठ्ठे
म्हणून मी जोरजोरात ओरडते

आईचं गाणं थांबतच नाही
म्हणून मी गाणं म्हणतच नाही
-०-०-

## हत्ती आणि बंब

हत्ती मोठा अगडबंब
लालभडक आगीचा बंब
हत्तीला असतो सोंडेचा पाईप
बंबाची सोंड म्हणजेच पाईप
दोघेही उडवतात पाण्याचे फवारे
भिजतात घरे, दारे नि पोरे.

-o-o-

## बँडवाले

बँडवाले आले
सोनेरी बिल्लेवाले

बाहुलाबाहुली नटली
सोंगे मस्त वठली

लग्न लागले बँड वाजला
एकच सारा गोंधळ माजला

आई ओरडली कसला दंगा
आलेच आता दाखवते इंगा

लगेच धूम पळाले
सगळे बँडवाले

-o-o-

## फुलपाखरू

फुलपाखरा फुलपाखरा
फुलाहून छान तुझा नखरा
जांभळा रंग, पांढरे ठिपके
पिवळी मान, निळे डोके
भरभर किती हवेत पळतोस
आमच्या हाती मुळी न येतोस
फुलाशी मात्र करतोस दोस्ती
मध दिसला की विसरतोस मस्ती

-o-o-

## भेळ

केनिया युगांडा टांगानिका
खेळुया मग भांडा टांगा विका
कामू मीरो मायकेलेंजेलो स्तानिस्लावस्की
काम करो ! सायकलनं गेलो ! त्यांनीच आणली भेळ सुकी !
-o-o-

## बोबडराव बोलके

बोबडराव बोलके
बोलतात अगदी शेलके

पेरूला म्हणतात पेलू
अन् खातात हळूहळू

आम्ही म्हणतो," पळा " -- ते म्हणतात, " पला "
पळताना ओरडतात, " आता पलत वला."

" अरे " ला ते जेव्हा म्हणतात  " का ले "
तेव्हा हसतात जमलेले सगळे

चिडतात खूप मग बोबडराव बोलके
बसतात बडवत ढाम ढाम ढोलके.
-o-o-

## सूर्य

सूर्य सुटला सुसाट
वारा झाला पिसाट
दिवस, रात्री भराभर
झाडे भूईसपाट.

घरे पडली धडाधड
गुरे, माणसे, पक्षी
समुद्र आणि जमीन यांची
मोडली सारीच नक्षी

आभाळभर माती झाली
दिवस गेले मळून
चांदण्यांच्या गर्दीमधून
चांदोबा गेला पळून
-०-०-

## हिप्पी

हिप्पी रे हिप्पी
घेऊ तुझी पप्पी ?
लिंबोणीच्या झाडामागे
खेळुया लप्पालप्पी ?

मी तुझा मित्र
हा घे माझा खाऊ
मजलदरमजल करत
मीही भटकायला येऊ ?
-०-०-

## फोन

रिंग वाजली घेतला फोन
सांगा म्हटलं बोलतंय कोण
आई तिकडून हासत सुटली
मला म्हणाली वेडी कुठली !
-०-०-

## गाववाले

गाववाले आले
सगळे खूष झाले
गाववाले आले
जेवले आणि पाणी प्याले
गाववाले आले
बोलबोल बोलले
नंतर मग थकून
ढाराढूर झोपले
आळशी गाववाले

नऊ वाजता उठले
तोंड न धुताच दूध प्याले
अंघोळीच्या वेळी रडू की हो लागले
याला सगळे हसले म्हणून
आले तसे निघून गेले.
-o-o-

## विमान आणि नाव

नावेत एकदा बसले विमान
लागला पूल आली कमान
नाव म्हणाली पंख घे मिटून
नाहीतर कमानीत जातील तुटून
विमान म्हणाले जराशी थांब
थांबली नाव की उडाले लांब
हलली नाव पण पुन्हा सावरली
हसली थोडी अन् पुढे निघाली
कमानीखालून नाव आली पुढे
तर ओरडले विमान खाली येऊन थोडे
तू आपली जा पाण्यावरून तरंगत
मोकळ्या आभाळाची नाही कुठे रंगत.

-o-o-

## फ्रिज

फ्रिज आमचा पडताच बंद
झाले सगळेच थंड थंड

सरबत नाही, आईस्क्रीम नाही
नाही साधे थंड पाणीही

दुरुस्तीनंतर चालू झाला आणि तो म्हणाला
राग घालवून थंड व्हा चला, चला, चला !
-o-o-

## झाडं, डोंगर, पक्षी

झाडं काही चालत नाहीत
डोंगर जागचे हालत नाहीत

डोंगर अडवतात ढग पाडतात खूप पाऊस
झाडे होतात हिरवीगार फिटते त्यांची हौस

झाडांवर असतात पक्ष्यांची घरटी
डोंगरांपल्याड त्यांची फिरती

संध्याकाळी पक्षी परत येतात
आपापल्या घरट्यात पटपट शिरतात

झाडं काही चालत नाहीत
पक्ष्यांची घरटी हरवत नाहीत.
-o-o-

## टीव्ही

टीव्हीला आम्ही विचारले एकदा
आणतोस कुठून इतके रंग
म्हणाला आणतो आकाशातून
करायला तुम्हाला मस्त दंग

मग आम्ही त्याला विचारले सरळ
कधीच तू कामाला कंटाळत नाहीस कसा
म्हणाला तो त्यावर मिचकावून डोळे
कंटाळा तुमचा घालवायलाच मी हा असा !
-o-o-

## म्हैस

म्हैस काळी काळी
खाते गांजाची गोळी

गात सुटते हासत सुटते
चौखूर उधळत नाचत सुटते

म्हणते मीच मीच महाराणी
म्हणणार ओरडत हंबरत गाणी

म्हशीचे काळ्या दूध मस्त पांढरे
पिताच मुलांची होतात मेंढरे

बाई म्हणतात चुप हसूबिसू नका
मुलांच्या डोक्यांत पिकतो मका

मुलांची मेंढरे मक्याची कणसे
म्हशीच्या गाण्यात वेडपट माणसे
-०-०-

## कॉम्प्युटर

कॉम्प्यूटरच्या पोटात
माहितीचे भांडार
आकाशातून पाऊस जसा
कोसळे धुवांधार
-०-०-

## बाहुली

बाहुलीनं केला संप
झाला मोठा भूकंप

रुमालावर काढली दोन माकडे
देऊळ झाले वाकडे तिकडे

पायात घातली निळी चप्पल
हरवली सगळ्या मुलांची अक्कल

लोक म्हणाले बाहुलीला आवरा
सूर्यही झाला कावरा बावरा

सगळ्यांनी शेवटी विचार केला
बाहुलीचा राग समजून घेतला

तिच्या गाण्याला कुणी म्हटलं नव्हतं छान
म्हणूनच ती चिडली होती मारत होती बाण

सगळे म्हणाले बाहुलीताई राहू आपण प्रेमात
जादू नका करू आता काम करू जोमात

एवढे म्हणताच बाहुली हसली आणि शांत झाली
संपबिंप रद्द करून पुन्हा सरळ खेळायला आली

म्हणाली प्रेमाशिवाय आहेच काय
जादूबिदू आता करायचीय काय !
-o-o-

## टेबललॅम्प

टेबललॅम्प असा
फुलांचा रंगीत
अभ्यास होतो छान
जणू काही संगीत
-o-o-

## ट्रिप

कांदिवलीचे कांदे
बोरिवलीची बोरे
खाऊन जायचं खाली
की गंगेचेच खोरे

गंगेची गाणी
गाऊन प्यायचं पाणी
जरा जायचं वर
की लंका राजधानी

लंकेतली लाकडे
ट्रिपवाली माकडे
आता जरा थांबा
पडेल पाऊल वाकडे
-o-o-

## वेडे मुनी

दोन वेडे मुनी
लावून बसले धुनी
एकाने म्हटले गाणे
दुसऱ्याने फेकले नाणे
एक म्हणाला दुसऱ्याला
देव तुझा दाखव मला
दुसरा म्हणाला थंडीच देव
पहिला म्हणाला धुनीच देव
दोघांचे भांडण पेटत गेले
पाहून सगळे भयभीत झाले
तांबडे डोळे पिंजारलेले केस
अंगाला भस्म विचित्र वेष
कुणीसे म्हटले झाले काय कारण
कशाला इतके माजवताय रण
नंतर कळले सगळ्यांना
देवावरून वाद झाला
तिसरा मुनी बघत होता
चणे खात हसत होता
तो म्हणाला ते दोघे पुरेपूर वेडे आहेत
मीच खरा देव असून खालीपिली भांडत आहेत.
-o-o-

## मराठी

गणित इतिहास इंग्लिश
दप्तर भरले गच्च
मराठी म्हणते माझे स्थान
यांच्याइतकेच उच्च !
-o-o-